**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०७/२०१८-१९/150 दिनांक: ०५.०७.२०१८ 05/07/2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ०७/२०१८-२०१९(२८.०६.२०१८)**

| | | |
|---|---|---|
| | में.वक्रतुंड मोटर्स,प्रोपा.श्रीकांत मोरे<br>२५०/बी/१ए/३ महावीर कॉलेज समोर<br>नागाळा पार्क, कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग, कोल्हापूर | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उत्तर उपविभाग कोल्हापूर | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

28/6/2018

प्रस्तुतची तक्रार तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हापूर यांचे दिनांक ०४.०५.२०१८ च्या आदेशा वरुन व्यथित होऊन दाखल केलेली आहे.

थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार प्रतिष्ठाण लघु उद्योगासाठी नोंदणी झालेली कंपनी आहे व त्याकरिता औद्योगिक विद्युत जोडणी सदर ठिकाणी धेण्यात आलेली आहे. सदर कंपनीतर्फे वक्रतुंड मोटर्स या नावाने लघु उद्योग चालविला जातो, व सदर उद्योगात मोटारींची देखभाल दुरुस्ती इत्यादी कामे केली जातात. कोणत्याही प्रकारचे उत्पादन त्या ठिकाणी केले जात नाही. माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिका-यांनी सदर विद्युत जोडणीची तपासणी केली असता. सदरची विद्युत जोडणी वाणिज्य दर संकेतात येत असून सुध्दा विजेची बिले औद्योगिक दराने आकारल्या जात असल्याचे त्यांच्या नजरेस आले. त्यामुळे सन-२०१२ पासून पुढील कालावधी करिता वाणिज्य दर संकेतांक व औद्योगिक दर संकेतांक यातील फरकाकरिता रु. ४,६४,९२०/- रु. एवढया मोठया फरकाच्या रक्कमेचे बिल तक्रारदारास दिनांक ३०.११.२०१७ रोजी देण्यात आले. सदर फरकाची रक्कम ही १ ऑगस्ट २०१२ ते ०५.११.२०१७ या कालावधी करिता देण्यात आली आहे. तक्रारदाराचे कथनानुसार मागील थकबाकी अयोग्य आहे . सबब ती रद्द करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर जाबदार वि.वि.कंपनीने हजर होऊन आपले म्हणणे सदर कामी मांडलेले आहे. त्यांच्या कथनानुसार तक्रारदाराची विज जोडणी संदर्भात पत्र क्र. २४.११.२०१७ चे पत्रासोबत औद्योगिक ते व्यापारी फरकाचे माहे ऑगस्ट २०१२ ते नोव्हेंबर २०१७ हया कालावधीतील फरकाचे पुरवणी देयक ग्राहकास दिले असता ते देयक स्विकारण्यास ग्राहकाने नकार दिल्याने सदरचे देयक दिनांक २७.०२.२०१८ चे विज देयकामध्ये समाविष्ट करण्यात आले. तथापि सदर फरकाचे तक्रारीबाबत तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे तक्रार दाखल केली होती, व ती तक्रार अंतर्गत कक्षाने फेटाळून लावलेली आहे. हया शिवाय वितरण कंपनीने इतर कोणतेही म्हणणे किंवा मागणी हया कामी केलेली नाही.

सदर प्रकरणाची सुनावणी आज रोजी या मंचा समोर घेण्यात आली असता तक्रारदार कंपनीचे मालक आपले प्रतिनिधी श्री नासिर बोरसदवाला यांचे सोबत हजर झाले तर वि.कंपनी तर्फे श्री ए.पी. मांडके,अतिरिक्त कार्यकारी अभियंता उत्तर उपविभाग, कोल्हापूर हजर होते. उभयतांनी आपआपला युक्तिवाद हया मंचासमोर सादर केला.

आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

**मुद्दा क्र.१ :-** पुरवणी देयक दिनांक ३०.११.२०१७ मधील दिनांक ०१ ऑगस्ट २०१२ ते ५ नोव्हेंबर २०१७ ची विज भार संकेतातील फरकाची मागणी कायदेशीर आहे काय?

**उत्तर :-** नाही

**मुद्दा क्र.२ :-** अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा आदेश योग्य आहे काय?

**उत्तर :-** नाही

**मुद्दा क्र.३ :-** अंतिम आदेश

**उत्तर :-** खालील प्रमाणे

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**मुद्दा क्र.१ व २ :-** हया ठिकाणी आम्ही हे स्पष्टपणे नमूद करु इच्छितो की, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक ०४.०५.२०१८ रोजी पारीत केलेला आदेश हा कोणत्याही निष्कर्षा वरुन योग्य आणि कायदेशीर ठरविता येत नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष किंवा हे मंच अर्ध न्यायिक स्वरुपाचे ग्राहकाची तक्रार निवारण करण्याकरिता आहे. हया यंत्रणेला आपले आदेश पारीत करत असतांना त्या आदेशा मागील सबळ कारणे देणे कायद्याने अभिप्रेत आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आपल्या आदेशात केवळ तक्रारदाराचे म्हणणे व वि.प. कंपनीचे म्हणणे थोडक्यात मांडून कोणतीही कारणमिमांसा न देता, उपलब्ध पुराव्याचे विश्लेषण न देता एका वाक्यात तक्रारदाराची मागणी फेटाळून लावली . अशा स्वरुपाचा आदेश नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग तर करतोच परंतु त्याला कुठल्याही कायद्याचा आधार देता येत नाही. केवळ हयाच कारणा वरुन हे मंच सदरचा आदेश रद्दबादल ठरवू शकते. तथापि हया मंचासमोर दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाला ग्राहकाची तक्रार असेही संबोधण्यात येते त्यानुसार तक्रारदाराची तक्रार निर्णीत करतांना हया मंचाला तक्रारदाराच्या तक्रारीतील गुण अवगुणांचा (मेरीटस्) चा विचार करावा लागेल, ही बाब उभयपक्षी मान्य आहे की, तक्रारदार कंपनीने विज जोडणीचा अर्ज दाखल करत असतांना ती जोडणी औद्योगिक वर्गवारीतून मागितलेली होती. सदरची कंपनी दिनांक १ जानेवारी २००० साली सुरु करण्यात आल्याचे विधान तक्रारदारातर्फे करण्यात आले. त्या काळात लागू असलेल्या दर संकेतात औद्योगिक आणि वाणिज्य अशा पध्दतीची वर्गवारी नव्हती ही बाब उभय पक्षांनी हया मंचासमोर मान्य केली आहे. तक्रारदाराचे कंपनीमध्ये वाहनांची केवळ देखभाल व दुरुस्तीचे काम चालते ही बाब देखिल वि.वि.कं.तर्फे अमान्य करण्यात आलेली नाही. त्या ठिकाणी कोणतेही उत्पादन होत नाही ही बाब देखिल उभयपक्षी मान्य आहे. सन-२०१२ साली वि.वि.कं. च्या दर संकेतांकात काही बदल घडविण्यात आले आणि त्या बदलानुसार वाणिज्य वापर आणि उद्योग वापर (Ind.Use) अशा वर्गवारी करण्यात आल्याचे वि.वि.कं. तर्फे सांगण्यात आले. ती वर्गवारी अंमलात आणते वेळी देखील तक्रारदाराची कंपनी चालू होती, व त्या आज चालू असलेल्या क्रिया त्याही वेळी चालू होत्या ही बाब देखील उभय पक्षी मान्य आहे. सन-२०१२ पासून सदर कंपनीस हया प्रकरणातील पुरवणी विज बिल देईपर्यन्त वापरलेल्या विजेकरिता औद्योगिक दरानेच विज बिले देण्यात येत होती व त्या देयकांची रक्कम तक्रारदाराने वेळोवेळी भरलेली आहे ही बाब देखिल विज वि.कं.तर्फे मान्य करण्यात आलेली आहे. सन-२०१२ साली दर संकेतांकात बदल करण्यात आलेले आहेत व तक्रारदाराचा विज वापर हा वाणिज्य स्वरुपाचा आहे ही बाब वि.वि.कं. कर्मचा-यांच्या नजरेस आलीच नाही असे म्हणता येत नाही किंवा आली असल्यास त्याकडे डोळेझाक झाली किंवा करण्यात आली असे मानण्यात पुरेसा वाव आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

श्री ए. पी. मांडके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपविभाग उत्तर, कोल्हापूर हयांचे कथनानुसार दिनांक २०.११.२०१७ रोजी भरारी पथकाने तक्रारदाराच्या विज जोडणीची तपासणी केली असता दरातील फरक दिसून आला व त्यानुसार तक्रारदारास दिनांक ३०.११.२०१७ रोजी दिनांक ०१.०८.२०१२ ते ०५.११.२०१७ हया मागील कालावधीतील विज आकारण्यातील फरकाचे पुरवणी देयक देण्यात आले व ते योग्य व कायदेशीर आहे. तक्रारदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री बोरसदवाला यांनी तक्रारदाराचे कंपनीमध्ये चालू असलेला विजेचा वापर हा वाणिज्य वर्गवारीत मोडतो औद्योगिक वर्गवारीत येत नाही. हे हया मंचासमोर मान्य करुन भरारी पथकाच्या तपासणीच्या दिनांका पासून पुढील कालावधी बिले वाणिज्य संकेताकानुसार देण्यास तक्रारदार तयार आहेत व तशी बिले आजतागायत भरत आहे. असे कथन केले तथापी त्यांच्या कथनानुसार मागील थकबाकीकरिता कोणतेही योग्य व कायदेशीर कारण हया प्रकरणातील तथ्यावरुन (Facts) दिसून येत नाही. श्री मांडके हयांना देखिल दरसंकेतांकातील फरकाला पुर्वलक्षी प्रभावाने (Retrospective effect) का लागू करण्यात आले व ते मूदतीच्या कायद्यानुसार मुदतीत आहे. हया बद्दल स्पष्टीकरण देता आले नाही. मा. विज लोकपाल हयांनी देखिल आपल्या प्रकरण क्र. ३ व४/२०१६ मधील दिनांक १५.०२.२०१६ हया आदेशाने विज दर संकेतातील बदल हा पुर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही. असे स्पष्ट केले आहे. सदरच्या आदेशात मा. वि. लोकपालांनी विज नियामक आयोगाच्या केस क्र. २४/२००१ मधील दिनांक ११.०२.२००२ चा संदर्भ दिलेला आहे व त्यात मा. नियामक आयोगाने खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.

"No retrospective recovery of arrear can be allowed on the basis of any abrupt reclassification of a consumer even though the same might have been pointed out by the Auditor. Any reclassification must follow a definite process of natural justice and the recovery, if any would be prospective only as the earlier classification was done with a distinct application of mind by the competent people. The same cannot be categorized as an escaped billing in the strict sense of the term to be recovered retrospectively."

त्यानुसार दिनांक ३०.११.२०१७ चे पुरवणी देयकामधील मागील कालावधी करिता केलेली कथीत थकबाकीची मागणी कायदेशीर असल्याचे म्हणता येत नाही . सबब तक्रारदाराची तक्रार अमान्य करता येत नव्हती. व ती अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने अयोग्यरित्या खारीज केलेली आहे, असा हया मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे.

हया सर्व कारणाकरिता तक्रारदारास देण्यात आलेल्या दिनांक ३०.११.२०१७ च्या पुरवणी बिलातील मागील थकबाकीची रक्कम अयोग्य व बेकायदेशीर आहे, व ती रद्द करावी लागेल असा हया मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब आम्ही वरील दोन्ही मुद्यांचे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्र.३ :-** वर नमूद केल्या कारणाकरिता प्रस्तुतची तक्रार मंजूर करावी लागेल असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## आदेश

१) तक्रारदाराराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. तक्रारदारास देण्यात आलेले दिनांक ३०.११.२०१७ चे दिनांक ०१.०८.२०१२ ते ०५.०११.२०१७ हया कालावधीतील दर संकेताकातील फरकाची मागणी करणारे पुरवणी देयक रद्द करण्यात येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

28/6/18 28/6 28/6/2018

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण